॥ श्री ॥
॥ बाबा ॥

# मुखप्रक्षालन

काकडा झाला आता मुख प्रक्षाला, बाबा मुख प्रक्षाला
मधु-नवनीत शुध्द शर्करा घेवूनी आली बाबांची बाला
उठले बाबा बसले रत्नखचित चौरंगी
भाली रेखिला कस्तुरी टिळा चंदन सर्वांगी
सुवासिक तुळशीची माळ, शिरी मुकुट नवरंगी
काकडा झाला आता मुख प्रक्षाला, बाबा मुख प्रक्षाला
सुवर्णाच्या तबकी भरल्या नवनीत शर्करा
तांबुल घेऊनी सखे चालती वारीत चामरा
तये वेळा भक्त गर्जती ओंकार तीन वेळा
काकडा झाला आता मुख प्रक्षाला, बाबा मुख प्रक्षाला
आपआपल्या जागी बैसती भक्त सभामंडपी
आनंदे गर्जती पदी ठेवूनी लल्लाट
ममदे सगळे उभे राहती जोडून कर
काकडा झाला आता मुख प्रक्षाला, बाबा मुख प्रक्षाला ।

★★★★★